**महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा**
**जिल्हा क्षयरोग नियंत्रण सोसायटी, लातूर**


| | |
|---|---|
| दुरध्वनी क्रमांक :- 02382 252455<br>ई-मेल:- dtomhltr@rntcp.org | कार्यालयः जिल्हा क्षयरोग कार्यालय, जुनी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, शिवाजी चौक, लातूर - ४१३५१२ |
| जिल्हा क्षयरोग अधिकारी<br>जिल्हा क्षयरोग केंद्र, लातूर. | जा.क्र./जि.क्ष.कें.लातूर/दरपत्रक/458/२६<br>दिनांक - १० /०२/२०२६ |


# नोटिस बोर्ड

**आरोग्य सेवा**

**प्रति,**

१)....................
२)....................
३)....................

**विषय :- राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमांतर्गत, एक्स-रे व्हॅन आऊटसोर्स करणेसाठी दरपत्रक सादर करणे बाबत.**

**संदर्भ** :- मा.मुख्यकार्यकारी अधिकारी जि.प.लातूर यांची मंजुर टिप्पणी दिनांक ०१/१२/२०२५

वरील विषयी सर्व संबंधित पुरवठादारांना कळविण्यात येते की, जिल्हा क्षयरोग केंद्र, लातुर या कार्यालया अंतर्गत कार्यक्षेत्रामध्ये गावोगावी जाऊन क्षयरोग संशयितींचे Digitel Chest X-Ray काढण्यासाठी फिरते क्ष-किरण वाहन आवश्यक आहे. खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे तपासणीचे दरपत्रक खालील अटी व शर्तीच्या आधीन राहुन मोहोरबंद लिफाफयामध्ये दि.१८/०२/२०२६ रोजी दुपारी ०४:०० वाजेपर्यंत जिल्हा क्षयरोग केंद्र लातुर येथे सादर करावीत.

| Sr No | Particular | Rate Per Quantity with all taxes |
|---|---|---|
| 1 | Per X-Ray per patients including all charges | |

**अटी व शर्ती**

१) दि१८/०२/२०२६ रोजी दुपारी ०४:०० वाजेपर्यंत जिल्हा क्षयरोग केंद्र लातुर मध्यवर्ती प्रशासकिय इमारत दुसरा मजला शिवाजी चौक बार्शी रोड लातुर येथे स्वीकारण्यात येतील व प्राप्त सर्व दरपत्रके दि१८/०२/२०२६ रोजी ठिक ०५:०० वाजता जिल्हा क्षयरोग केंद लातुर यांच्या दालनामध्ये उघडण्यात येतील.

२) दरपत्रक लिफाफयावर क्षयरुग्णांची एक्स-रे चाचणी करीता दरपत्रक असा उल्लेख असावा.

३) सादर करण्यात येणारे दर हे सर्व करासहित असावे.

४) मुदतीत काम न झाल्यास शासन नियमानुसार दंड आकारण्यात येईल.

५) इच्छुक पुरवठादारांनी GST, PAN चे प्रमाणपत्र व संस्थेचे वैद्य नोंदणी प्रमाणपत्र (शॉप ॲक्ट) जोडणे

Scanned with OKEN Scanner

आवश्यक आहे. वरील प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती सोबत नसल्यास ते दरपत्रक फेटाळण्यात येईल.

६) प्रती संशयीत क्षयरुग्ण तपासणीसाठी शासनाने दिलेल्या दराप्रमाणे कमाल मर्यादा रु.३४५/- प्रती एक्सरे या मर्यादित वाटाघाटी अंती दरनिश्चिती करण्यात येईल.

७) प्रत्येक संशयीत क्षयरुग्णांचे एक्सरे काढल्यानंतर एक्सरेचा अहवाल निक्षय पोर्टलवर अपडेट करणे बंधनकारक राहील. तसेच दरमहा किंवा दरपंधरा दिवसांनी तालूका आरोग्य अधिकारी/वैद्यकिय अधिकारी किंवा जिल्हा क्षयरोग अधिकारी साक्षांकित केलेल्या क्षयरुग्णांच्या दिलेल्या यादीनुसारच एक्सरे काढण्यात यावेत.

८) देयक दोन प्रतित जिल्हा क्षयरोग अधिकारी कार्यालयास सादर करावेत. सोबत संशयीत क्षयरुग्ण एक्सरे यादी व निक्षय पोर्टल वरील अपडेटेड रिपोर्ट दयावेत.

९) तसेच पुरवठाधारकाकडे AERB (Atomic Energy Regulatory Board) Licence असणे आवश्यक आहे. तसेच पात्र क्ष-किरण तंत्रज्ञ असणे आवश्यक आहे.

जिल्हा क्षयरोग अधिकारी
जिल्हा क्षयरोग केंद्र,लातूर

Scanned with OKEN Scanner